# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART TWO


गुरूवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०१७

## अधिसूचना

क्रमांक : १३७/२०१७ दिनांक : २८.९.२०१७

**विषय :- विषय/अभ्यासक्रम बंद करण्याबाबत...**

सर्व सामान्यांच्या माहीतीकरीता सूचित करण्यात येते की, खाली दर्शविलेल्या महाविद्यालयातील बी.ई.वस्त्रोद्योग अभियांत्रिकी हा विषय/अभ्यासक्रम बंद करण्याबाबतचा प्रस्ताव महाविद्यालयाकडुन प्राप्त झाला होता. प्राप्त प्रस्ताव महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ९२ च्या तरतुदीनुसार विद्वत परिषद व व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात आलेला होता विद्वत परिषद व व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिल्यानुसार सदर विषय/अभ्यासक्रम बंद करण्याचे मान्यतेकरिता प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला होता.

महाराष्ट्र शासनाने शासन पत्र क्र.टीईएम-२०१७/(C.R.54)/ TE-4,दि.२८/०२/२०१७ अन्वये सदर विषय/अभ्यासक्रम बंद करण्यास मान्यता दिलेली आहे.त्यानुसार खालील तक्यामध्ये दर्शविलेला विषय/अभ्यासक्रम शै.सत्र २०१६-१७ पासुन महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ९२ च्या तरतुदीनुसार बंद करण्यात येत आहे.

**TABLE**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | विषय/अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| १. | अनुराधा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग चिखली,जि.बुलडाणा. (३२०) | बी.ई.वस्त्रोद्योग अभियांत्रिकी |

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

*****

## अधिसूचना

क्रमांक : १३८/२०१७ दिनांक : २८ सप्टेंबर, २०१७.

**विषय : २०१५-२०१६ व २०१६-२०१७ शैक्षणिक सत्राची स्व. दिलीप बी. शिंगोरे शिष्यवृत्ती.**

सर्व सामान्यांचे माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, स्व. दिलीप बी. शिंगोरे शिष्यवृत्ती दाननिधी विनियमातील तरतुदीप्रमाणे, २०१५-२०१६ शैक्षणिक सत्रामध्ये प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेन्ट, बडनेरा रेल्वे जि. अमरावती येथे अभियांत्रिकी स्नातक (इलेक्ट्रीकल ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स) अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिकत असलेली **कु. गायत्री विजय अर्मळ** या विद्यार्थीनीने अभियांत्रिकी स्नातक (इलेक्ट्रीकल ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स) प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षात सलग उत्तीर्ण होऊन एकत्रितरीत्या सर्वाधिक गुण प्राप्त केल्यामुळे २०१५-२०१६ शैक्षणिक सत्राच्या स्व. दिलीप बी. शिंगोरे शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेली आहे.

तसेच २०१६-२०१७ शैक्षणिक सत्रामध्ये जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ येथे अभियांत्रिकी स्नातक (इलेक्ट्रीकल) अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिकत असलेले **श्री सुमित सुरेश डिकुंडवार** या विद्यार्थ्याने अभियांत्रिकी स्नातक (इलेक्ट्रीकल) प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षात सलग उत्तीर्ण होऊन एकत्रितरीत्या सर्वाधिक गुण प्राप्त केल्यामुळे २०१६-२०१७ शैक्षणिक सत्राच्या स्व. दिलीप बी. शिंगोरे शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेला आहे.

**२०१५-२०१६ या शैक्षणिक सत्रामध्ये रु. २,०००/- (अक्षरी रु. दोन हजार फक्त) स्व. दिलीप बी. शिंगोरे शिष्यवृत्ती कु. गायत्री विजय अर्मळ यांना व २०१६-२०१७ या शैक्षणिक सत्रामध्ये रु. २,०००/- (अक्षरी रु. दोन हजार फक्त) स्व. दिलीप बी. शिंगोरे शिष्यवृत्ती श्री सुमित सुरेश डिकुंडवार यांना प्रदान करण्यात येत आहे.**

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.